MHLA050000602019



## नि.क्र.५४ वर आदेश
## (दिनांक २३.०३.२०२१)

वादी हिने सदरच्या दाव्यात दस्ताऐवज दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. वादी हिच्यातर्फे ॲड. श्री. ए. एस. पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना सदरच्या दाव्यात महत्त्वाचे दस्ताऐवज दाखल करायचे आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, वादी हिचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. प्रतिवादी क्रं.५ तर्फे ॲड. श्री. डी. एल. घोगरे यांनी असा युक्तीवाद केला की, सदरच्या दस्ताऐवजांचा या दाव्याशी कोणताही संबंध नाही. तसेच वादी हिने सदरचे दस्ताऐवज हे पुराव्याच्या वेळी दाखल केल्यामुळे ते अभिलेखावर घेण्यात येवू नये. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

३. सदरचा दावा हा वादी हिच्या पुराव्याकरीता प्रलंबित आहे. वादी हिचा पुढील सरतपास अद्याप सुरु झालेला नाही. त्यामुळे वादी हिने सादर केलेले दस्ताऐवज हे अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण त्यांना सदरच्या दस्ताऐवजांवर त्यांचे आक्षेप नोंदविण्याची व उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2021.03.23 17:53:52 +0530

अहमदपूर (अ.रा. सुर्वे)

दिनांकः— २३.०३.२०२१ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

अहमदपूर.